# बृन्हमुंबई महानगरपालिका

परिपत्रक

२०१८-१९

क्र. सीए/सीपीडी/ १२ दि.२४ .०७.२०१८.

विषय :- ऑनलाईन व्हेंडर रजिस्ट्रेशन बाबत.

संदर्भ :- १) सीए/एफएआर/ २३ / २००६-०७ दि.०२/०१/२००७.

२) CA(F)/FAR/34 DT.12.08.2011

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या व्हेंडरच्या अधिदानाकरिता व्हेंडर नोंदणी करणे उपरोक्त १ संदर्भिय परिपत्रकानुसार बंधनकारक आहे व सदर व्हेंडरच्या माहितीत कोणतेही बदल करावयाचे असल्यास उपरोक्त २ संदर्भिय परिपत्रकानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. आजतागायत सदर कामकाज व्हेंडरद्वारे प्रत्यक्ष अर्ज प्राप्त करून मनुष्यबळाने करण्यात येत होते. तथापि, उक्त नमूद सर्व प्रक्रिया मनुष्यबळाऐवजी दि. २३/०७/२०१८ पासून ऑनलाईन पद्धतीने करण्यात आली असल्याने कंत्राटदार , पुरवठादार , सल्लागार ई. नी व्हेंडर रजिस्ट्रेशन बाबतचे अर्ज तसेच आवश्यक कागदपत्रे नोंदणीशुल्क ई. बाबी ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. व्हेंडर रजिस्ट्रेशन बाबतची कार्यप्रणाली ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात येत असल्याने उपरोक्त क्र. २ संदर्भिय परिपत्रकानुसार एखाद्या व्हेंडरने त्यांच्या अस्तित्वात असलेल्या व्हेंडर तपशिलात बदल करावयाची विनंती केल्यास संबंधित उपभोक्ता खात्याने ना हरकत प्रमाणपत्राबाबतची आवश्यक ती कार्यवाही करून संबंधित व्हेंडर्सना आवश्यक 'ना हरकत प्रमाणपत्राची' प्रत पीडीएफ स्वरुपात (२० एमबी कमाल मर्यादेपर्यंत) / ई-मेल द्वारे देण्यात यावे, जेणेकरून त्यांना सदर प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने अपलोड करणे सहज शक्य होईल.

दि.२३/०७/२०१८ पासून व्हेंडर रजिस्ट्रेशन करण्याबाबतचे कोणतेही कामकाज / पत्रव्यवहार मनुष्यबळाने होणार नसून म.न.पा. च्या अधिकृत संकेतस्थळावर Online Services > Vendor Registration या मथळयाखाली दर्शविल्यानुसार नुसार होणार आहे.

उक्त नमूद सुचनांव्यतिरिक्त संदर्भीय क्र. १ व २ या दोन्ही परिपत्रकांत कोणतेही बदल नाहीत.

सर्व खाते प्रमुख / सहाय्यक आयुक्त / रुग्णालय अधिष्ठाता / वैद्यकीय अधीक्षक /उपप्रमुख लेखापाल / लेखा अधिकारी यांनी उपरोक्त सूचनांची नोंद घेऊन काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| २१/०७/२०१८ | २१/०७/२०१८ | २३/०७/२०१८ |
| ( श्रीम. छाया बा. विटेकर ) | ( श्री. नरेंद्र रा. बर्डे ) | ( श्रीम. आय. ए. कुंदन) |
| प्रमुख लेखापाल (मखखा ) | मा.उप आयुक्त (म.ख.खा) | मा.अति.आयुक्त (प.उप) |

---

परिपत्रक

२०१८-१९

क्र. सीए/सीपीडी/ १२ दि.२४ .०७.२०१८.

प्रत ...............................................(जादा .........प्रतिंसह) यांना माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहिकरिता अग्रेपित.

लेखा अधिकारी (मखखा )

NS1227-CIR-BMPP-32507-2018-19-2500 Copies

Scanned by CamScanner